Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179,
Near e-Balbharti, Behind Agharkar
Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९, ई
बालभारती शेजारी, आघारकर रिसर्च
इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807
Email : secretary.stateboard@gmail.com

क्र.रा.म./ऑनलाईन/११७/२८९५
पुणे-४११००४
दिनांक – ०८.०७.२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

विषय : जून-जुलै २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) माहिती तंत्रज्ञान (IT) व सामान्यज्ञान (GK) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत.

संदर्भ : राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./ऑनलाईन/७४/२२२३, दिनांक २६ जून, २०२६.

महोदय,

संदर्भाधीन पत्राद्वारे जून-जुलै २०२६ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) माहिती तंत्रज्ञान (IT) व सामान्यज्ञान (GK) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

सदर पत्रातील सूचना क्र. १० नुसार तांत्रिक व्यत्यय अथवा अन्य कारणांमुळे नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०९ जुलै, २०२६ रोजी पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत राज्यातील काही भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे तसेच स्थानिक प्रशासनामार्फत जाहीर करण्यात आलेल्यां सुट्ट्यांमुळे काही विद्यार्थ्यांना नियोजित वेळापत्रकानुसार परीक्षा देता आलेली नसल्यास, अशा विद्यार्थ्यांच्या बाबतीतही सदर परिस्थिती "अन्य कारण" म्हणून विचारात घेऊन त्यांना दिनांक ०९ जुलै, २०२६ रोजी आयोजित पुनर्परीक्षेस बसण्याची संधी उपलब्ध करून द्यावी.

याबाबत संबंधित सर्व परीक्षा केंद्रांना तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना तात्काळ सूचित करून आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

(मा. अध्यक्ष यांच्या मान्यतेने.)

(डॉ. दिपक माळी )
(सचिव )
राज्य मंडळ, पुणे – ४११ ००४.

क्र. कोविमं/आयटी ऑनलाईन/2433
दिनांक :-08/07/2026

**प्रति,**
**प्राचार्य, सर्व कनिष्ठ महाविद्यालय,**
**सातारा / सांगली / कोल्हापूर**

**उपरोक्त पत्रातील सुचनांची नोंद घेवून सदर बाब संबंधित विद्यार्थ्यांना अवगत करून पुढील कार्यवाही करावी.**

8.7.2026
**प्र. विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**